Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P013

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

# शिवकालीन स्वराज्य : एक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम. इ. एस. कॉलेज मेहकर,
जिल्हा बुलढाणा.
मो. नं. **99222 38998**
ईमेल - amitshingane@gmail.com

***Received on:*** *16 May ,2024* ***Revised on:*** *20 June ,2024* ***Published on:*** *30 June ,2024*

सारांश -

भारतामध्ये प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत अनेक राजवटी सत्ताकेंद्री आल्या. या राजवटींनी भारतामध्ये अनेक काळापर्यंत राज्य केले. मोगल साम्राज्य हे सोळाव्या शतकामध्ये स्थापन झालेले दक्षिण आशियामधील एक मोठे साम्राज्य होते. सन **1700** च्या सुमारास मोगल साम्राज्य जवळ जवळ भारतभर पसरले होते. सन **1707** मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्याचा अस्त होण्यास सुरुवात होऊन सन **1857** साली ब्रिटिशांनी दिल्ली ताब्यात घेऊन मोगल साम्राज्य खालसा केले व हिंदुस्थानवर एकछत्री अंमल सुरू केला. त्यानंतर **1857** ते **1947** दरम्यान भारताचे साम्राज्य ब्रिटिश सरकारच्या सत्तेखाली राहिले. या सर्व कालखंडामध्ये म्हणजे सतराव्या शतकाच्या मध्यात महाराष्ट्रात शिवाजी महाराजांनी मराठ्यांचे स्वराज्य निर्माण केले. शिवाजी महाराज हे एक हिंदू राजे होते; परंतु त्यांनी सर्वधर्म समभाव जोपासून मराठा म्हणजे महाराष्ट्रात राहणाऱ्या सर्व जाती धर्माचे स्वराज्य उभारले. जे स्वराज्य आज **350** वर्षानंतर देखील सर्वांना सर्वश्रुत आहे. ते शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या ध्येय धोरणामुळे आणि त्याच्या कार्यकर्तृत्वामुळे. त्यामुळे शिवकालीन स्वराज्य हे वर्तमान काळात देखील आपले आदर्श स्थान कायम ठेवून आहेत.

**Keyword –** शिवकाल, स्वराज्य धार्मिक आणि सामाजिक सलोखा, शिवाजी महाराज.

## प्रस्तावना -

छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू होऊन जवळपास **350** वर्षे उलटली. तरीही त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आठवण झाल्याबरोबर महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला अभिमान वाटतो. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची महाराष्ट्रात पायाभरणी करून जगासोबतच भारताला 'स्वराज्याचा' पहिला धडा दिला. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य आकाराने खूप लहान असले तरीही ते संपूर्ण भारतामध्ये त्याकाळी स्वतंत्र आणि

सार्वभौम होते. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती करीत असताना स्वराज्याचे रूपांतर सुराज्यामध्ये करण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. म्हणून महाराष्ट्रातील अठरा पगड जातींच्या लोकांना 'हिंदवी स्वराज्य' हे आपलेच स्वतःचे स्वराज्य आहे असे वाटत होते. हिंदवी स्वराज्याच्या जडण-घडणीसाठी बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार, गावकुसातील आणि गावकुसाबाहेरील प्रत्येकांनी आपले सर्वस्व स्वखुशीने शिवाजी महाराजांच्या स्वाधीन करून त्यांच्या पाठीशी उभे राहिले, प्रसंगी प्राणाची आहुती देखील हसत हसत दिली. त्यामुळेच शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यात कधीही धार्मिक दंगल अथवा धार्मिक बंडखोरी झालेली दिसत नाही. धार्मिक आणि सामाजिक सलोखा हे शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे फार मोठे वैशिष्ट्य होते. आज एकविसाव्या शतकात स्वतंत्र भारतामध्ये देखील जातीय दंगली वारंवार उसळताना आपण पाहत आहे. सन **1947** मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाची भारत, पाकिस्तान ही फाळणी होऊन देशांमध्ये ठिकठिकाणी जातीय दंगली होऊन हजारो, लाखो लोकांना आपल्या जीवास मुकावे लागले. जातीय दंगलीची ही भीषणता आपण स्वातंत्र्यानंतरही देशांमध्ये पाहत आहोत. परंतु शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यामध्ये कधीही जातीय दंगली उसळल्या नाहीत. सतराव्या शतकामध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केले. त्यावेळेस भारतामध्ये हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख इत्यादी धर्म आणि याशिवाय समाजात भटक्या जमाती आणि देशांमध्ये व्यापारासाठी आलेल्या परकीय सत्ता देखील होत्या. परंतु यामध्ये कुठेही जातीय दंगली उसळल्या नाहीत किंवा स्वराज्यामध्ये जातीभेद - पंथभेद पाळल्या गेला नाही. त्यानंतरच्या काही कालावधीमध्ये देखील समाजामध्ये जातीभेद नव्हता. हे शिवकालीन स्वराज्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे देशातील व देशाबाहेरील अनेक नामवंत इतिहासकारांनी, संशोधकांनी व अभ्यासकांनी खूप मोठ्या प्रमाणात संशोधन केलेले आहे. तसेच त्यावर आणखी कित्येक जण संशोधन करत आहेत. शिवाजी महाराजांची शिवनीती व त्यांच्या कार्यावर आधारित अनेक जण शिकण्याचा प्रयत्न करत आहेत. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात असलेल्या विविधतेमधून एकता कशी होती, ह्यावर अभ्यास करण्याचा प्रयत्न करत आहेत. याद्दष्टीने शिवकालीन स्वराज्य समजून घेण्यासाठी सदर शोधनिबंध महत्त्वाची भूमिका बजावतो.

शिवकालीन स्वराज्य -

शिवाजी महाराजांनी कधीही स्वराज्यात जातीभेद, पंथभेद केला नाही. स्वतःच्याच जातीच्या लोकांची कामे करून त्यांनी आपणा स्वार्थ साधला नाही. त्यांनी कधीच स्वराज्यातील कोणत्याच किल्ल्यांना आपल्या जातीधर्माची नावे दिली नाहीत. त्यांनी स्वराज्यात सर्वच जातीची धर्माची मंदिरे उभारली. दर्गा, मशीद, चर्च, गुरुद्वारा यांना अपाय केला केला नाही. शिवाजी महाराजांनी आपल्या जाती सोबतच आपल्या इतर सर्व जातींचा विकास व्हावा त्यांचे कल्याण व्हावे, त्यांना चांगल्या प्रकारे उपजीविका करता यावी, त्यांना

अभिमानाने समाजात वावरता यावे ह्या साठी सर्वांना समान वागणूक दिली, सन्मान केला, समान संधी दिली, समान न्याय केला आणि गुन्हेगाराला समान शिक्षा देखील केली.

"जात कोणती पुसू नका,
धर्म कोणता पुसू नका,
माणुसकीचे आम्ही उपासक
माणुसकीला पुसू नका."

वरील ओळीप्रमाणे शिवकाळाचा अगदी यथोचित गौरव करता येतो. आपल्या कुटुंबाला जास्त संरक्षण देणे आणि इतरांना राजकुटुंबापेक्षा कमी पाहणे असे नियम असे देखील कधीच केले नाही. जो नियम स्वराज्यात सामान्य जनतेला, रयतेला होता तोच नियम स्वराज्याच्या राजाला, राजांच्या घरातील व्यक्तींना देखील होता. ह्यात काही स्वार्थी लोकांनी मात्र शिवाजी महाराजांना न कळता सर्वजातीधर्माचे स्वराज्य हडपण्यासाठी टोकाचे प्रयत्न केल्याचे दिसते. परंतु शिवाजी महाराज हे सर्व जाणत होते त्यांना ह्या गोष्टींचा अंदाज येत असत, पण समान न्याय नियम ह्यामुळे त्यांनी विशिष्ट जातीला, कूट कारस्थाने करणाऱ्याला कधीच पाठीशी घातले नाही, तर त्याला देखील दरबारात दोषरोप चालवून निर्दोशी आल्याचे सिद्ध करावे लागले. परंतु त्यांनी कूट कारस्थाने करणाऱ्यांनी आपले निर्दोषत्व सिद्ध न करू शकल्याने त्यांना स्वराज्यात खुद्द शिवाजी महाराजांनी शिक्षा केल्याचे आपण वाचतो. उदा. पाटलावर केलेली शिक्षा.

शिवाजी महाराजांच्या कार्यात त्यांना साथ देणारी जीवलग, जीवाला जीव देणारी मंडळी होती म्हणूनच स्वराज्य निर्मितीचा संकल्प सिध्दीस गेला. ही आठरा-पगड जातीची मानस एकत्रित करणे, हा सुध्दा शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे एक खास वैशिष्टच होते. तत्कालीन काळात महाराष्ट्रातील जातीयतेची ताठरता किंवा तिव्रता काही प्रमाणात निश्चितच कमी झालेली दिसते. वीर मावळे जिवा महाला, शिवा काशिद, लाय पाटील, बहिर्जी नाईक, नाकनाक महार इत्यादी विविध जातीच्या लोकांच्या हातामध्ये ब्राम्हणी व्यवस्थेने दिलेले उपजिवेकेचे साधने काढून त्याच्या हातामध्ये लष्करी आवजारे देणारी स्वराज्याचा व्यवस्था निर्माण केली ती शिवाजी महाराजांनी यांनीच. यावरून शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे परिवर्तनाच्या दिशेने जाणारे होते याची खात्री पटते. जगदवंदनीय, विश्वभुषण शिवाजी महाराजांचे विचार किती प्रगल्भ होते हे लक्षात येते. शिवाजी महाराज यांनी फक्त अठरापगड जाती, सर्व धर्मच एकत्र केले नव्हते तर ते इतर देशातील लोकांचा देखील आदर करत होते. त्यात आवर्जून सांगावं वाटत की, स्वराज्य निर्मिती वेळी 'राज्य अभिषेका' वेळी रायगडावर सर्व राजांना निमंत्रित केले होतच; त्याचबरोबर इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच ह्यांना देखील आमंत्रित केले होतं. ह्यामागे शिवाजी महाराजांचे खूप मोठे स्वराज्य विषयक नियोजनात्मक धोरण होते. शिवाजी महाराजांच्या ह्याच कार्यामुळे शिवकालीन स्वराज्य हे इतर सर्व साम्राज्यापेक्षा आगळे वेगळे होते, असे म्हणणे वावगे ठरणार आहे.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P013

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

शिवकालीन स्वराज्यातील स्थानिक व्यवस्था -

शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले हिंदवी स्वराज्य दख्खन म्हणजेच महाराष्ट्र व कर्नाटकाच्या प्रदेशात पसरले होते. उत्तरेच्या बाजूने मोगल, पूर्वेला कुतुबशाही, दक्षिणेला आदिलशाही, पश्चिमेला युरोपीयन अशा शत्रूंच्या मध्ये शिवाजी महाराजांचे स्वराज्य होते. त्यामुळे स्वराज्य रक्षणासाठी त्यांनी आपल्या साम्राज्याचे चार मोठे भाग केले होते.

1. उत्तर कोकण व साल्हेर ते पुणे पर्यंतचा प्रदेश.
2. पुणे ते धारवाड पर्यंतचा प्रदेश.
3. दक्षिण कोकण आणि कारवार बेदनूर पर्यंतचा प्रदेश.
4. म्हैसूर आणि तामिळनाडूचा प्रदेश.

राज्यकारभाराच्या दृष्टीने स्वराज्याचे विभाजन अनेक सुभ्यात (प्रांत) व त्याचा प्रमुख सुभेदार होता. काही कागदपत्रावरुन सरसुभ्यांचे आणि त्यावरील सरसुभेदारांचे देखील उल्लेख मिळतात. ज्यामध्ये प्रामुख्याने **1.** कल्याण-भिंवडी, **2.** तळकोकण, **3.** कुडाळ, **4.** पुणे, **5.** सातारा-वाई, **6.** पन्हाळा, **7.** बंकापूर, **8.** कोपल या सरसुभ्याचे सुभ्यांत, महाल विभागात विभागणी केलेली होती असे नमूद केलेले आहे.

स्वराज्यातील सर्वात लहान (राजकीय) घटक म्हणजे गांव अथवा मौजा आणि त्याचा प्रमुख पाटील असे. सुभ्याचे लहान भाग म्हणजे परगणे होत. त्याच्या व्यवस्थेसाठी हवालदाराची नियुक्ती केलेली असे. ते प्रामुख्याने लष्करी अधिकारी असायचे. परगणे पेक्षा लहान विभाग म्हणजे महाल होता. त्याचा कारभार देशमुख व देशपांडे नावाचे अधिकारी पाहत असत. राज्यकारभाराचा सर्वात शेवटचा घटक म्हणजे ग्राम होय. ग्रामाची व्यवस्था पाटील व कुलकर्णी ह्यांच्याकडे होती. शिवाजी महाराजांचे सर्व लहान - मोठे अधिकारी स्वराज्यनिष्ठ, धर्मनिष्ठ, स्वामीनिष्ठ, प्रामाणीक, कर्तव्यदक्ष व लोककल्याणाची तळमळ असणारे होते. आणि शिवाजी महाराजांचे त्याच्या सर्व आधिकाऱ्यांवर पूर्णत: नियंत्रण होते.

स्वराज्यातील धार्मिकता -

स्वराज्यातील धार्मिक धोरण हे अतिशय उदार स्वरूपाचे शिवाजी महाराजांनी निर्माण केले. हिंदु धर्मशास्त्र आणि त्यातील आदर्श तत्त्वावर त्यांनी स्वराज्याची उभारणी केली. हे सत्य असले तरीही स्वराज्यात सर्व धर्म समभावाचे धोरण स्विकारले होते. सर्व धर्मक्षेत्रांना सारखाच आदर सन्मान होता. सर्वधर्माच्या साधुसंतांना सारख्याच आदर भावाने वागविले जात होते. केळूसीच्या बाबा याकुत खान यांची शिवाजी महाराजांनी अनेक वेळा भेट व दर्शन घेतले होते. त्यांना आर्थिक मदतही केली. शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली 'सर्वधर्म समभावा' चे तत्व हे केवळ दिखावा नव्हता तर ते त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणले होते. धार्मिक

उदारतेबरोबर शिवाजी महाराज हे पुरोगामी विचाराचे होते. हिंदू धर्मातून जबरदस्तीने वा चुकीने मुसलमान धर्मात गेलेल्यांना शिवाजी महाराजांनी शुध्द करुन पुन्हा हिंदु धर्मात घेतले. ह्या दृष्टीने नेताजी पालकर व बजाजी निंबाळकरचे उदाहरण महत्त्वाचे आहे. एकदा मुसलमान झाला की हिंदुपासून कायमचे तुटले जायचे त्या काळात शिवाजी महाराजांनी केलेले हे कार्य अत्यंत मोलाचे व थोर समाज सुधारकाचे होते ह्यात संशय नाही.

शिवाजी महाराजांचे समकालीन फारसी लेखक खॉफीखान याने आपल्या 'मुनाखब-उल-तुआब' या ग्रंथात शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची स्तुती केलेली आहे. तो लिहतात की, "शिवाजी महाराजानी आपल्या सैन्यासाठी असा नियमच बनविला होता की, युध्द मोहिमेत परधर्मियांच्या धार्मिक स्थळांची लुट करावयाची नाही. लुटीत धर्मग्रंथ हाती आल्यास आदरपूर्वक परत करावयाचा, शत्रूची बायका, मुले हाती आली तर त्यांना सन्मानपूर्वक परत पाठवायचे." एवढेच नसून युध्दात मृत्यू पावलेल्या आपल्या सैनिकाबरोबरच शत्रू सैन्यातील मृत सैनिकांचेही दफन केले जात असे. इतिहासकार ग्रँट डफ व सर जदुनाथ सरकार यांनीही शिवाजी महाराजांच्या उदार व सहिष्णू धार्मिक धोरणांची स्तुती केली आहे.

लष्करी व्यवस्था -

शिवाजी महाराजांनी आपल्या लहानशा पुण्याच्या मोकासा जहागिरीतून स्वराज्य संस्थापनेचा उद्योग केला. भोवताली मोगल व आदिलशहा सारख्या प्रबळ राजांचे प्रदेश होते. काल पिरिस्थितीला अनुरुप व साधन सौलभ्यतेप्रमाणे शिवाजी महाराजांनी आपले युध्दतंत्र निर्माण केले. हजुरात, लष्कर व आरमार, गडकोट, जलदुर्गाची व्यवस्था लावली. मावळांतील डोंगर-दऱ्याखोऱ्यातील काटक मावळ्यांना आपले सैनिक म्हणून गोळा केले. शिवाजी महाराजांच्या सैन्यात पायदळ, घोडदळ, आरमार असते तीन विभाग असत.

शिवाजी समोर लष्कर संघटनेची स्पष्ट कल्पना होती, लष्करी सुधारणांसाठी निश्चित योजना होत्या. शिवाजी महाराज हे जन्मजात लष्करी नेता होते. तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन त्याने आपले सैन्यसंघटन व काळजीपूर्वक, काटेकोरपणे व दूरदृष्टीने केले. म्हणूनच शक्तीशाली मोगलांविरुध्दे, दक्षिणेतील आदिलशाही व कुतुबशाहीविरुध्द तसेच इंग्रज, पोर्तुगीजांविरुध्द त्याला दैदीप्यमान विजय प्राप्त झालेत. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीमुळे मराठ्यांच्या लष्कराच्या इतिहासात एक नवे युग सुरु झाले. **"His Military organisation was a model of efficiency and simplicity"** असे शिवाजी महाराजांच्या लष्करी व्यवस्थेचे वर्णन इतिहासकार सरकारने केले आहे.

राजस्व धोरण -

शिवाजी महाराजांच्या राजस्व धोरणाचे वैशिष्ट्य म्हणजे पराक्रमाबद्दल शिवाजी महाराजांने कधीही जमिनी दिल्या नाहीत. फक्त देवालयांना, धर्मदाय संस्थांना जमिनी दिल्या जात. शासन व शेतकरी ह्यांच्यामधील जमीनदार वर्ग नेहमीच शेतकऱ्यांवर अत्याचार करी. म्हणून जमीनदार पध्दती बंद करुन शिवाजी

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2406IIV12P013

e-ISSN No. 2394-8426
June-2024
Issue–II, Volume–XII

महाराजांनी हा मध्यस्थ वर्ग नष्ट केला. वसूलीसाठी सरकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन शासनाचा सरळ जनतेशी संबंध प्रस्थापित केला. शिवकाळात जमीन मोजण्यासाठी काठीचा उपयोग करण्यात येत. उत्पन्नाच्या आधारावर जमिनीचे उत्कृष्ट, मध्यम व कनिष्ठ असे भाग पाडून त्यानुसार उत्पन्नाच्या ⅖ भाग कर म्हणून वसूल केल्या जाई. हा कर धान्याच्या रुपात होता. त्याशिवाय अनेक करापासून मिळणारे उत्पन्न राज्यकार्यासाठी खर्च होत असे. शेतकऱ्यांप्रती शिवाजी महाराजांचा दृष्टीकोन पूर्ण सहानुभूतीचा होता. वेळोवेळी तो शेतकऱ्यांना मदत करी. दुष्काळी परिस्थितीत सारा माफ केला जाई. परचक्र, टोळधाड, महापूर अशा आकस्मित संकट प्रसंगी शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई देत असे. शिवकाळातील स्वराज्याच्या उत्पन्नाचे दुसरे महत्त्वाचे साधन म्हणजे चौथाई व सरदेशमुखी होय. स्वराज्याचा प्रदेशाची शत्रूपासून संरक्षण करण्याची जबाबदारी घेऊन शिवाजी महाराजांनी त्या प्रदेशातून उत्पन्नाचा चौथा भाग 'चौथाई' म्हणून वसूल करीत असे. अर्थात यामुळे दोन्ही गोष्टी साध्य होत. स्वराज्यासाठी पैसा मिळे व संरक्षित प्रदेशावर शिवाजी महाराजांचे वर्चस्व प्रस्थापित होई. म्हणजे चौथाईचा उद्देश आर्थिक व राजकीय स्वरुपाचा होता. उत्पन्नाचे आणखी एक साधन म्हणजे सरदेशमुखी होय. शिवाजी महाराजांनी स्वतःला संपूर्ण राज्याचा सरदेशमुख समजून राज्यातील उत्पन्नाचा **1/10** भाग वसूल करीत असे. अशा प्रकारचे शिवकालीन स्वराज्यातील राजस्व धोरण होते.

निष्कर्ष -

1. आधुनिक काळातील धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक समायोजन या दोन तत्वांना शिवाजी महाराजांनी आपल्या प्रशासकीय धोरणाचा पाया ठरवून त्यावर हिंदवी स्वराज्याची उभारणी केलेली होती.
2. शिवाजी महाराजांनी स्वराज्यात जी धोरणे राबविली ते त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणली. ज्यामुळे त्याच्या धोरणांचा सन्मान आजही केला जातो.
3. शिवाजी महाराजांनी सर्वधर्म समभाव या तत्त्वाचे पालन आयुष्यभर केले आणि स्वराज्यात ह्या तत्वाची काटेकोर अंमलबजावणी केली.
4. शिवकालीन स्वराज्यामध्ये सर्वांना न्याय, हक्क आणि कर्तव्य याची जाणीव खुद्द शिवाजी महाराजांच्या आचरणांने लागली.
5. शिवकालीन स्वराज्य हे प्रजेचे राज्य होते. प्रजेच्या मताला सर्वोच्च स्थान होते.

संदर्भ ग्रंथ सूची -

1. काळे म.वा. - मराठ्यांचा इतिहास, प्राची प्रकाशन, मुंबई, **1918.**
2. कुलकर्णी अ.रा - शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती **1993.**
3. गाठाळ, एस.एस. - मराठ्यांचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, **2019.**

4. रडे, प्रा. का.रा.; चौधरी, प्रा. श्रेया - मराठी सत्तेचा उदय (इ.स. 1630-1707), प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2013.
5. राऊत, गणेश - छत्रपती शिवाजी महाराज आणि शिवकाळ, डायमंड पब्लिकेशन पुणे, प्रथम आवृत्ती 2013.
6. शहा, डॉ. जी.बी. ; वाघ, डॉ. डी.एन. ; चौधरी डॉ. एच. आर. - मराठ्यांचा इतिहास (1600-1750) प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, 2019.